सवलतीच्या दरात पाठविण्याचा पोस्ट परवाना – Regd. NSK / 231/2012-2014
सदर अंक प्रत्येक महिन्याच्या १० तारखेस नाशिक G.P.O. येथे पोस्टींग केला जातो.

**किंमत १ रुपया**



अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ३५ वे | अंक ३ रा | १० एप्रिल २०१४

## सामुहिक व्रतबंध

संस्थेतर्फे शुक्रवार दि. ९ मे २०१४ रोजी सामुदायिक व्रतबंध सोहळा संस्थेच्या काका गद्रे मंगल कार्यालयात संपन्न होणार आहे. तरी लवकरात लवकर इच्छुक सभासदांनी आपल्या बटुचे नाव नोंदवावे.

वेळ : सकाळी १० ते १ व दुपारी ४ ते ८ पर्यंत

सोहळ्याचे शुल्क रु. २०००/– (यात ५ जण न्याहारी व जेवणासह). जादा व्यक्तींसाठी रु. १२५ प्रत्येकी.

**मौंजीचा मुहूर्त सकाळी १०.३६ वा.**

## अमृत महोत्सवी सत्कार

संस्थेतर्फे गुरुवार दि. १ मे २०१४ रोजी श्री परशुराम जयंती या दिवशी अमृत महोत्सवी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी ज्या सभासदांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे, अशा सभासदांनी आपली नावे संस्थेच्या गद्रे मंगल कार्यालयात द्यावी. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या कुटुंबियांमधील ज्येष्ठ व्यक्तींची नावे संस्थेकडे माहितीसह द्यावीत.

## संस्थेच्या महिला मंडळातर्फे स्नेहबंध मैत्रिणींचा

महिलांसाठी परशुराम जयंतीच्या दिवशी १ मे २०१४ रोजी चैत्र गौरी हळदीकुंकवाचा समारंभ आयोजित केला आहे. तरी महिलांनी अवश्य उपस्थित रहावे.

**कार्यक्रमाची वेळी : सायंकाळी ७ वा.**

# श्री परशुराम वेद पुरस्कार



**प्रमुख अतिथी –**

**श्री. प्रकाश गंगाधर पाठक**

एम.कॉम., सि.ए., एल.एल.बी., चार्टर्ड अकौंटंट म्हणून २५ वर्षांपासून कार्यरत आहेत. तसेच शैक्षणिक क्षेत्रात ज्युनिअर, सिनिअर कॉलेजेसमधून व पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणूनही कार्य व गेल्या २ वर्षापासून मॅनेजमेंट इन्स्टिट्युट मध्ये डायरेक्टर या पदावर आहेत.

श्री. प्रकाश पाठक हे नाशिकमधील विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांमधून विविध पदांवर काम करीत आहे. त्यात प्रामुख्याने

- सेन्ट्रल हिन्दु एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी
- संस्कार भारती महाराष्ट्र स्टेट चे प्रेसिडेंट
- जळगाव जनता सहकारी बँकेचे माजी संचालक
- वंदे मातरम् कमिटी अंडर एच.आर.डी. मिनिस्ट्री गव्हर्नमेंट ऑफ इंडिया नॉर्थ महाराष्ट्रचे माजी चेअरमन
- स्वा. सावरकर प्रतिष्ठानतर्फे स्वा. सावरकर सिनेमा चे को–ऑर्डिनेटरही होते.
- शैक्षणिक क्षेत्रात हायर सेकंडरी बोर्डसाठी अकौंटन्सी या विषयावर विविध पुस्तकेही लिहिली आहेत.
- स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद यांच्या विषयीचा दांडगा व्यासंग असून महाराष्ट्रभर या विषयांवर दोन हजाराहून अधिक व्याख्याने दिलेली आहेत.

**पुरस्कार :**

सन २००९–१० या वर्षाचा पी.बी.भावे पुरस्कार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे इकॉनॉमिक निबंध स्पर्धेमध्ये सलग तीन वर्षे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त.

श्री परशुराम वेद पुरस्कार व अमृत महोत्सवी सत्कारासाठी आपल्याला असे नामवंत, अभ्यासक प्रमुख पाहुणे म्हणून लाभले आहेत.



**ऋग्वेद – वेदमूर्ती श्री. मंदारशास्त्री श्रीधरशास्त्री पाटणकर, त्र्यंबकेश्वर**

**वैदिक शिक्षण :**

- प्राथमिक शिक्षण घरातच वे. श्री. दादाशास्त्री पाटणकर व वे. अण्णाशास्त्री सरडे यांच्याकडे झाले.
- पुण्याच्या वे. घैसास गुरुजी वेदपाठशाळेत दशग्रंथी वैदिकाचे शिक्षण १२ वर्ष गुरुगृही राहून पूर्ण केले.


**अनुभव :**

- स्वतःच्या राहत्या घरात वेदपाठशाळा सुरू केली.
- अनेक वैदिक संमेलनात सक्रिय सहभाग
- वे. घैसास गुरुजी जन्मोत्सवानिमित्त गेली १२ वर्षे त्र्यंबकेश्वर येथे चतुर्वेद पारायण पूर्वक संहिता स्वाहाकाराचे यशस्वी आयोजन करीत आहेत.
- अधिक मासात तीस तीन संहिता स्वाहाकार करून धार्मिक क्षेत्रात वेगळी छाप उमटवली.
- सन २०११ मध्ये क्षेत्रिय वैदिक संमेलन त्र्यंबकेश्वर येथे घेऊन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ३ दिवसीय निवासी संमेलन.
- चित्तपावन संस्थेत चतुर्वेद पारायण पूर्वक संहिता स्वाहाकाराचे आचार्यपद भूषवले.
- त्र्यंबकेश्वर येथील श्री परशुराम मंदिर संस्थेचे सचिव पद भूषवून संस्थेच्या सर्व कामकाजात लाक्षणिक बदल घडवला.
- बहुभाषिक ब्राह्मण संमेलनात सहभाग.

**पुरस्कार :**

- राष्ट्रसंत गाडगे महाराज विधायक कार्य सेवा समिती कडून समाजशिल्प पुरस्कार मिळाला आहे.

- इंदौर येथील वैदिक आश्रमात नरहर गुरु ललीत वैदिक पुरस्काराने सन्मानित.



## यजुर्वेद – वेदमूर्ती श्री. सूर्यकांत गजानन राखे, नाशिक

**वैदिक शिक्षण :**

- चतुर्वेदेश्वरधाम संगमेश्वर सावरगाव आश्रम, महामहोपाध्याय यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे यांच्या वेदपाठशाळेत वेदमूर्ती श्रीनिवास जोशी यांच्याजवळ वेदाध्ययन प्रारंभ.
- श्रीमान किसनलाल बस्तीरामजी सारडा संचलित सद्‌गुरू गुरुगंगेश्वर वेद पाठशाळा नाशिक येथे शुक्ल यजुर्वेद माध्यन्दिनी शाखा – वैदिक सम्राट श्रीकृष्ण शास्त्री गोडसे गुरूजींजवळ संहिता, पद पाठ, क्रमपाठ, जटापाठ, घनपाठ, शतपथ ब्राह्मण, पारस्कर गृह्यसूत्र, याज्ञवल्क्यशिक्षा, कर्मकांड, ज्योतिष, संस्कृत आदी अध्ययन संपन्न झाले.
- वेद विशारद, वेदचूडामणि, वेद रत्न, वेदालंकार, ज्योतिष शास्त्री, ज्योतिष भास्कर.
- परमपूज्य शक्तीपाताचार्य नारायणकाका ढेकणे महाराज द्वारा शक्तीपात दीक्षा १९९० प्राप्त झाली.
- १९९२ पासून गुरू महाराजांच्या सेवेला प्रारंभ.
- गुरु महाराजांच्या सान्निध्यात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध, योगवसिष्ठ वाचन.
- गुरू महाराजांच्या समवेत भारतभर भ्रमण.
- २००४ फेब्रुवारी वाराणसी येथे शक्तीपात दीक्षा अधिकार प्राप्त.
- भारतभर यज्ञ याग, वैदिक संमेलन, ज्योतिष अधिवेशन, कर्मकांड, शक्तीपात महायोग संमेलन आदी कार्ये सुरू आहेत.

**विविध कार्ये :**

- प. पू. शक्तीपाताचार्य श्री. नारायणकाका ढेकणे महाराज सहस्र चंद्रदर्शन शांती महोत्सव अध्यक्ष
- संपूर्ण भारतभर सिद्धयोग प्रचार कार्य
- परमहंस परिव्राजकाचार्य श्री. लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज महायोग ट्रस्ट, नाशिकचे विश्वस्त.
- सिद्धयोग फौंडेशनचे विश्वस्त.
- सिद्धयोग प्रचार कार्याचे महाराष्ट्र प्रमुख.
- प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये भारतीय संस्कृती व सिद्धयोग या विषयावर मार्गदर्शन.
- जमी उलेमा व आईम्मा व हुफ्फाजेकराम तर्फे संभाजीनगर (औरंगाबाद) येथे ''मानवता का संदेश'' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे. मानवता म्हणजेच प्राण देवता यावर व्याख्यान.
- विविध सामाजिक कार्यामध्ये कार्यरत आहे.

## सामवेद – वेदमूर्ती श्री. राघव शिवराम रामदासी, पुणे

**शैक्षणिक अर्हता :**

- सामवेद प्रकृती – ऊह रहस्यान्त संपूर्ण गान
  मंत्रसंहिता – पद संपूर्ण
  छान्दोग्योपनिषद, छान्दोग्यमन्त्रब्राह्मण

**प्रशस्तिपत्रके :**

- दक्षिणाम्नाय श्रृंगेरीपीठ – २००९
  रहस्यान्त, उत्तम श्रेणीत उत्तीर्ण
- गणपति सच्चिदानंद पीठम्, म्हैसूर – २००९
  रहस्यान्त, उत्तम श्रेणीत उत्तीर्ण
- वेदशास्त्रोत्तेजक सभा – २००९
  सामवेद कोविद, उत्तम श्रेणीत उत्तीर्ण
- सांदिपनी विश्वविद्यालय – २००५
  सामवेद विद्वान

**आधुनिक शैक्षणिक अर्हता :**

- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ – २०११
  बी. ए. संस्कृत
- पुणे विद्यापीठ – २०१२
  एम.ए. चे प्रथमवर्ष पूर्ण, द्वितीय वर्ष चालू आहे.



### अथर्ववेद – वेदमूर्ती श्री. दिगंबर दत्तोपंत कुलकर्णी, जालना

**शैक्षणिक अर्हता :**

- ढालेगाव, जि. परभणी येथे वेदमूर्ती दिनकर सुधाकरराव जोशी यांच्याकडे अथर्ववेद (शौनक) संहिता, ब्राह्मण उपनिषद शाखेचे संपूर्ण अध्ययन केले.
- अवधूत दत्त पीठम्, म्हैसूर (कर्नाटक) येथे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- मेधा दक्षिणा मूर्ती संस्कृत कॉलेज, गोकर्ण (कर्नाटक) येथे परीक्षा दिली.
- वेदशास्त्र संपन्न, नागनाथ शास्त्री इनामदार कोटगीर आंध्रप्रदेश यांच्याकडे वास्तुशास्त्राचा अभ्यास केला.
- दक्षिणाम्नाय शारदा पीठम् श्रृंगेरी यांच्या होणाऱ्या वार्षिक वैदिक संमेलनात सहभाग.

## अभिनंदन



संस्थेचे आजीव सभासद **श्री. सुधाकर अनंत जोशी** अंबिकानगर, नाशिक यांनी दि. १४/११/२०१३ ते २१/२/२०१४ या काळात नर्मदा परिक्रमा ९८ दिवसात पायी करून ९९ व्या दिवशी ओंकारेश्वरास अभिषेक करून समाप्त केली. नर्मदा मातेचे कृपेने परिक्रमा निर्विघ्नपणे पार पडली.

**दुकान कामासाठी**

**अनुभवी व विश्वासू माणूस पाहिजे**

**संपर्क. ९४२०९०१९०७**

## परशुराम जयंती उत्सव सोहळा

परशुराम जयंती उत्सव सोहळा समितीतर्फे बुधवार दि. ३० एप्रिल २०१४ रोजी सायंकाळी ६.०० वा. शंकराचार्य न्यास, जुना गंगापूर नाका, नाशिक येथे श्री. संचितानंद शेवडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

गुरुवार दि. १ मे २०१४ रोजी सायंकाळी ४.०० वा. गणपती मंदिर भद्रकाली येथून परशुराम जयंती निमित्त, भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी सर्व सभासदांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

## परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

लंडन येथे स्थायिक असलेल्या एका नामवंत चित्तपावन डॉक्टरांनी भारतातून परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती जाहीर केली आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी या sunadoc@gmail.com ई–मेल आयडीवर संपर्क साधावा.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

**मिहिर कन्स्ट्रक्शन**

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेक्शा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक. फोन : २५९०७५४

**ईमेल :** cvranade@gmail.com

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल** : ०९४२२२४६८७८

# चित्तपावन उद्योजक मंच



मनोज परांजपे

उद्योजक मंचाच्या मार्च महिन्याच्या सभेचा विषय प्रत्येक उद्योजकाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता कोणत्याही उद्योगाचा कणा म्हणजे भांडवल किवा अर्थपुरवठा आणि हा अर्थ पुरवठा करणारी संस्था म्हणजे बँक, या सभेचा विषय त्यामुळे बँक आणि अर्थ पुरवठा यासंबंधी होता. सभेस मार्गदर्शक म्हणून ठाणे जनता बँकेचे ए.जी.पी. श्री. गोरे उपस्थित होते तसेच चार्टर्ड अकौटंट श्री. संदीप फाटक होते. श्री गोरे गेली वीस वर्ष या क्षेत्राशी संबंधित आहेत. कोणताही नवा उद्योग अथवा जुन्या उद्योगाचा विस्तार करताना प्रोजेक्ट रिपोर्ट कसा असावा, तो करताना कोणत्या गोष्टी महत्वपूर्ण असतात, कोणत्या गोष्टीचा सारासार विचार आवश्यक असतो आणि चार्टर्ड अकौंटंट त्यात महत्वाची भूमिका कशी बजावू शकतो याचे मार्गदर्शन श्री. फाटक यांनी आपल्या सादरीकरणामधून उपस्थितांना केले. कर्जाचा प्रकार, त्याचा कालावधी या गोष्टी कशाच्या आधारावर ठरवाव्या ह्याचेही मार्गदर्शन केले. श्री. गोरे यांनी कर्ज पुरवठ्याची मागणी बँकेकडे करताना अगदी फॉर्म भरण्यापासून कशी काळजी घ्यावी ह्याचे मार्गदर्शन केले. कर्ज मागणाऱ्याकडून बँकेची असलेली अपेक्षा, कागदपत्राची पूर्तता, याही विषयाचे मार्गदर्शन केले. सहकारी बँकांकडून होणारा पतपुरवठा अधिक सुलभ कसा असू शकतो हे सांगितले. तसेच बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर दिलेले मंजुरी पत्र पूर्णपणे वाचण्याचे व समजावून घेणे कसे महत्वाचे असते हेही सांगितले. एका बँकेकडून दुसऱ्या बँकेकडे कर्जाचे प्रकरण कमी व्याज दराच्या आकर्षणामुळे बदलताना त्यात असू शकणाऱ्या छुप्या खर्चाचा विचार जरूर केला जावा अशी सूचनाही त्यांनी केली, उद्योजक प्रतिनिधी म्हणून श्री. देवेंद्र बापट यांनी सभेचा समारोप केला आणि ठाणे जनता सारख्या बँकेचे सहकार्य आपल्या उद्योजकांनी घ्यावे असे आवाहन केले.

एप्रिल महिन्याच्या सभेत मुंबई येथील श्री. मनोज परांजपे आपल्याला मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत. श्री. परांजपे बी.कॉम.,एल.एल.बी.,एम.पी.एम. असून आजपर्यंत अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये एच.आर. प्रमुख म्हणून काम केले आहे (Asian Electronics, Crompton, VIP Industries, TATA Electric इत्यादी). सध्या ते Deepak Fertilizar येथे कार्यरत आहेत. कारखान्यात कामगार हिताच्या दृष्टीने अनेक गोष्टी राबवण्याची गरज

**फक्त उच्चशिक्षित ब्राह्मण स्थळांकरिता २५ वर्षांची विश्वसनीय विवाह संस्था**

**आता घर बसल्या वेबसाईटवर स्थळे बघा • ३५००+ स्थळे**
**कुंडली व प्रोफाईल मॅचिंग • प्रोफाईल हायलायटींग**
**एक्सप्रेस इंटरेस्ट • पालकांसाठी सोपी वेबसाईट**

|| ShubhaVishva ||
जुळवी नाते जन्माचे

६९६, नारायण पेठ, कुंटे चौक, पी. एन्. गाडगीळ ज्वेलर्सच्या वर, लक्ष्मी रोड, पुणे ४११०३०
फोन : (०२०) २४४५७०७० / २४४९५००७
वेळ : सकाळी ११ ते सायं ७ (सोमवारी बंद)

**www.shubhavishva.co.in**

असते त्या कशा राबवाव्या त्यासाठी त्यांनी महिन्यातून दोन वेळा एकत्र येणे,कुटुंबाचा स्नेहमेळावा, विविध विभागांचा स्नेहमेळावा, प्रोत्साहनपर बक्षिसे अशा उपक्रमांचा अवलंब केला आहे. कामगार आणि व्यवस्थापन या दोघांनी आपापल्या कामाचा दर्जा कसा सुधारावा याबद्दलचे अनेक उपक्रम त्यांनी राबविले आहेत. त्याचप्रमाणे उद्योगाच्या विविध विभागांच्या प्रगतीसाठी अनेक तऱ्हेची प्रशिक्षणे त्यांनी आत्तापर्यंत घेतलेली आहेत. विविध आरोग्यविषयक शिबिरे, वृक्षारोपणाचे कार्यक्रम, आपत्कालीन व्यवस्थापन, ग्रामीण मुलांना मार्गदर्शनपर शिबिरे, या गोष्टी व्यवसायाची सामाजिक जबाबदारी म्हणून पार पाडल्या आहेत. आपल्या कारकिर्दीत संपाच्या परीस्थितीचा यशस्वी सामना त्यांनी केलेला आहे. तसेच बोनससंबंधी करार इत्यादी गोष्टी सामंजस्याने सोडविल्या आहेत. अशा चतुरस्त्र अनुभव असलेल्या व्यक्तीचे मार्गदर्शन आपल्या उद्योजक मित्रांना करण्यासाठी ते उपस्थित राहणार आहेत. व्यवस्थापन आणि कामगार या दोन्ही गोष्टी कोणत्याही व्यवसायाच्या दृष्टीने नेहमीच महत्वपूर्ण असतात. त्यामुळे श्री. परांजपे सारख्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाचा लाभ प्रत्येक. उद्योजकाने घ्यावा आणि मोठ्या संख्येने सभेस उपस्थित राहावे अशी आग्रहाची विनंती आहे.

## * भावपूर्ण श्रद्धांजली *



आपल्या संस्थेचे आजीव सदस्य व ज्येष्ठ नागरिक **श्री. नरसिंह कृष्णाजी बापट** (वय ७९) यांचे दि. १६ मार्च २०१४ रोजी दुःखद निधन झाले. एस.टी. महामंडळाचे ते सेवानिवृत्त अधिकारी होते. चित्तपावन उद्योजक मंचचे अध्यक्ष श्री. मधुकर बापट यांचे ते काका होत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा)





दि. २२ मार्च २०१४, शनिवार चित्तपावन महिला मंडळाची सभा काका गद्रे मंगल कार्यालयात झाली. ह्यावेळी कुमारी निशिगंधा वझे हिने सर्व सदस्य महिलांना रोजचा आहार कसा असावा? कोणत्या खाद्यपदार्थांमधून शरीरास आवश्यक कोणत्या गोष्टी मिळतात? ह्याची माहिती दिली. तसेच मैत्रिणींच्या मनात असलेल्या अनेक गैरसमजांचे योग्य स्पष्टीकरण केले व स्वानुभवातून तुम्ही निर्णय घ्या, पुस्तकात वाचून किंवा टीव्ही पाहून काय करायचे ते ठरवू नका, हा महत्त्वाचा व मोलाचा सल्ला दिला. जिव्हाळ्याचा विषय असल्याने मैत्रिणींनी खूप प्रश्न विचारले. निशिगंधाने त्याला सविस्तर व उदाहरणे देऊन उत्तरे दिली व शंकांचे निरसन केले. कार्यक्रम छान झाला.

यावेळी मंगला जोगळेकर यांनी निशिगंधा वझे हिचा परिचय करून दिला. मैथिली गोखले यांनी आभार मानले.

पुढील महिन्यात दि. २६ एप्रिल रोजी शनिवारी सायं. ५ वा. महिला मंडळाची सभा होईल. यामध्ये सौ. प्रतिभा जोशी ह्या काही अनुभव आपल्याला सांगणार आहेत. तसेच श्रीमती मैथिली गोखले ह्यांचे कथाकथन होईल. सर्व मैत्रिणींनी कार्यक्रमास अवश्य यावे.

**चुकीची दुरुस्ती** : गेल्या अंकात सौ. निशिगंधा वझे असे नाव चुकीने छापले गेले होते. तिचे नाव कुमारी निशिगंधा वझे असे आहे.

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ८१ | मेहुल महेश मोघे<br>बी/९ विश्रामनगर सोसायटी, तक्ष कॉम्प्लेक्स समोर, वासना रोड, बडोदे (गुजराथ) - ३९०००७.<br>फोन : ०२६५-२२५०१४३, मो. ०९७८७८१७३६८ | १८-१-८५ | मुद्गल | ६.१ | बी.कॉम. | २५,००० (मासिक) |
| ८२ | पुष्कर रत्नाकर कुलकर्णी<br>१००६/७, जैन मंदिराजवळ, मु.पो.ता. सिन्नर - ४२२ १०३.<br>फोन : ०२५५-१२२०१३४, मो. ९८५००४६१३४ | २७-५-८० | कौशिक | ५.४ | डिप्लोमा सीव्हील इंजिनियर घटस्फोटित | ९०,००० (मासिक) |
| ८३ | निखिल मकरंद वैद्य<br>१०, चंद्र अपार्ट, इंद्रनगरी, मटाले मंगल कार्यालयासमोर, कामटवाडा रोड, नाशिक-९.<br>फोन : २३७९५७२, मो. ९३७०५१६८२५, ९२२५१०६८२५ | १४-५-८७ | गार्ग्य | ५.१० | बी.ए. | १३,००० (मासिक) |
| ८४ | अमेय सुभाष लेले<br>फ्लॅट 'बी', रेवतीकुंज, नेर्लिकर हॉस्पिटल जवळ, गंगापूर रोड, नाशिक-१३. फोन : २३४७२४७, मो. ९९६०११३५९३ | २०-१२-८५ | काश्यप | ५.४ | बी.एस्सी. (इले) | २३,००० (मासिक) |
| ८५ | राहुल श्रीपाद पुराणिक<br>मु.पो. पलसाना, हरीहरनगर, ता. पलसाना, जि. सुरत ३९४३१५<br>मो. ९०३३९७५७९७, ९४२७५८६३२६ | १५-९-८८ | कोंडिण्य | ५.९ | बी.कॉम. पीजीडीएचआरएम | २०,००० (मासिक) |
| ८६ | विक्रम अजित साठे<br>'मानस' बंगला, रुंग्ठा हायस्कूल समोर, रामवाडी रोड, नाशिक-२<br>फोन : २५७४४८५, मो. ९८२२५११३४५ | १८-१२-८१ | वसिष्ठ | ५.९ | बी.कॉम., एल.एल.बी. (मुंबई हायकोर्ट) | ४०-५०,००० (मासिक) |
| ८७ | राहुल जयंत केतकर<br>शुभश्री (पुष्कराज) बी विंग, दुसरा मजला, बिग बाझार मागे, कॉलेज रोड, नाशिक-२. मो. ९३२२१३४६२७ | २६-११-७४ | गार्ग्य | ५.७ | बी.कॉम. | २५,००० (मासिक) |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | कविता शांताराम शुक्ल<br>२२३०, मधली होळी, शुक्ल वाडा, नाशिक-१.<br>फोन : २५९३९२९, मो. ९६६५१२१०२३ | १७-८-९० | काश्यप | ५.१ | बी.एस्सी (टेक्स्टाईल) एम.ए.-पार्ट १ | ८००० (मासिक) |

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक

काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक - ४२२ ००२.
दूरध्वनी : २३१३७०९

## ठेवीवरील व्याजदर तक्ता

| | | व्याजाचा दर | प्रकार |
|---|---|---|---|
| ● बचत खाते | - | ४.०० % | ६ महिने |
| ● ३० दिवस ते ९० दिवस | - | ७.०० % | सरळ व्याज |
| ● ९१ दिवस ते १८० दिवस | - | ८.०० % | सरळ व्याज |
| ● १८१ दिवस ते १२ महिने | - | ९.५० % | सरळ व्याज |
| ● १३ महिने ते ३५ महिने | - | ११.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● ३६ महिने ते ९५ महिने | - | ११.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● दामदुप्पट योजना ९६ महिने | | | |

१३ महिने व त्यावरील मुदतीस ०.५०% जादा व्याज ज्येष्ठ नागरिकांकरीता

● विशेष ठेव योजना : १२ महिन्यांसाठी ११.००% सरळव्याज सर्व वयोगटासाठी ●


चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस्, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक-२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक - ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**फोन - चित्तपावन : २५०११०७, गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

● Website : www.nasikchitpavan.org
● Email ID : nasikchitpavan@gmail.com
● http:\\twitter.com\nasikchitpavan
● http:\\facebook.com\nasikchitpavan
● http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. चित्तपावन मित्र च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.